ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३३ • मंगळवार दि.२७ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना पाच हजारांचा दिलासा!

### ई-वाहन निर्मिती,चिपी विमानसेवेसह मंत्रिमंडळाचे १२ निर्णय



मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम थेट जमा केली जाणार आहे. या निर्णयासह मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध विभागांशी संबंधित १२ महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली.

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजनेला जिल्हास्तरीय योजनेचा दर्जा देण्यासह दिव्यांगांच्या कल्याणासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील एक टक्का निधी वापरण्यास मंजुरी देण्यात आली. जलसंपदा विभागाच्या ३९ हजार ७२२ पदांच्या आकृतिबंधालाही मान्यता देण्यात आली असून, सिंचन व्यवस्थापनासाठी नवीन पदांची निर्मिती करण्यात येणार आहे. पुण्यातील लोहगाव येथे दिल्लीतील भारत मंडपमच्या धर्तीवर राष्ट्रीय प्रदर्शन केंद्र उभारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्राच्या इलेक्ट्रिक वाहन प्रोत्साहन धोरणांतर्गत बजाज ऑटो कंपनीला ई-वाहन निर्मितीसाठी ६६ कोटी ८२ लाख रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळावरून नवी मुंबईसाठी विमानसेवा सुरू करण्याच्या दृष्टीने विमान कंपन्यांना १०० टक्के व्यवहार्यता तफावत निधी देण्यासही मान्यता देण्यात आली. लातूर जिल्ह्यातील शिरूर ताजबंद येथील मल्हारराव होळकर भटक्या-विमुक्त जमाती सहकारी सूतगिरणीला शासन अर्थसाहाय्य मिळणार आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरणात सुधारणा, जिल्हा परिषदांमधील प्रशासकीय पदांचे एकत्रीकरण आणि धुळे जिल्ह्यातील रावेर येथील २८९ हेक्टर ६९ आर जमीन औद्योगिक विकास महामंडळाला उपलब्ध करून देण्याच्या निर्णयांचाही यात समावेश आहे. याशिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियमात सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यानुसार प्र-कुलगुरूंना पदावरून हटविण्याचे अधिकार कुलपतींना मिळणार आहेत. शेतकरी मदत, सिंचन, औद्योगिक विकास, विमान वाहतूक आणि प्रशासकीय सुधारणांशी संबंधित या निर्णयांच्या अंमलबजावणीकडे आता लक्ष लागले आहे.

## नांदेड-उधना विशेष रेल्वेगाड्या रद्द

नांदेड/प्रतिनिधी-दक्षिण मध्य रेल्वेतर्फे हजूर साहिब नांदेड-उधना दरम्यान विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्यात आल्या होत्या.



मात्र, या गाड्यांना कमी प्रतिसाद मिळत असल्याने खालील विशेष रेल्वेगाड्यांच्या उर्वरित फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. गाडी क्र. ०७६०५ हजूर साहिब नांदेड-उधना ह्या विशेष गाडीच्या २ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर २०२६ दरम्यानच्या एकूण ४ फेऱ्या रद्द करण्यात येत आहेत. गाडी क्र. ०७६०६ उधना-हजूर साहिब नांदेड ह्या विशेष गाडीच्या ३ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२६ दरम्यानच्या एकूण ४ फेऱ्या रद्द करण्यात येत आहेत. प्रवाशांनी वरील बदलांची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत करण्यात येत आहे.

## वाहेगाव नदीघाट भागात पोलीसांची दोन ठिकाणी कारवाई

### दीड कोटी रुपयांचा ऐवज जप्त

नांदेड/प्रतिनिधी-वाहेगाव परिसरात गोदावरी नदीच्या पात्रातून अवैध रेती उपसा करणाऱ्या दोन ठिकाणी नांदेड ग्रामीण पोलीसांनी धाडी टाकुन दीड कोटी रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.



वाहेगाव परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधरित्या रेतीसा उपसा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी सोमवार दि.२६ ऑक्टोबर रोजी वाहेगाव जवळील नदीच्या पात्रातून अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी छापा टाकला. पोलीसांना बघून रेती उपसा करणारे इसम नदीत उड्या मारुन पळून गेले. पोलीसांनी घटनास्थळावरुन एक जेसीबी मशिन जप्त केली. त्यानंतर पोलीस पथकाने आणखी काही अंतरावर सुरु असलेल्या ठिकाणी कारवाई केली. पोलीसांनी घटनास्थळावरुन तीन लोखंडी बोट, दोन लहान लोखंडी बोट, दोन इंजीन असा १ कोटी २६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आठ जणांविरुध्द विविध कलमान्वये दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## दुष्काळात शैक्षणिक फीचा ताण;इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव

नायगाव/प्रतिनिधी-राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करीत असताना इंग्रजी माध्यमांच्या काही शाळांमधील शैक्षणिक शुल्क वसुलीच्या पद्धतीबाबत पालकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. फी थकीत असल्यामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव आणला जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

काही पालकांच्या म्हणण्यानुसार, फी वेळेत न भरल्यास प्रथम सत्र परीक्षेचे हॉल तिकीट दिले जाणार नाही किंवा परीक्षेला बसू दिले जाणार नाही, अशा सूचना विद्यार्थ्यांना दिल्या जात आहेत. तसेच घटक चाचणीच्या वेळी फी थकीत असलेल्या विद्यार्थ्यांना इतरांपासून वेगळे बसवून काही वेळानंतर प्रश्नपत्रिका दिली जात असल्याचीही तक्रार आहे. शुल्क थकीत असल्यामुळे अध्यापनात वेगळा दर्जा दिला जात असल्याचा आरोपही काही पालकांनी केला आहे. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांचा ताण लक्षात घेता, शुल्कवसुलीच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना मानसिक त्रास होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १७ मध्ये बालकांना शारीरिक शिक्षा व मानसिक छळापासून संरक्षण देण्याची तरतूद आहे. संबंधित प्रकरणात लागू कायदे व नियमांच्या आधारे वस्तुस्थिती तपासणे पान ४ वर

## वाडी पुयड येथील अवैध सावकाराच्या घराची व दुकानाची झाडाझडती

### हिशेब वह्या व दस्तऐवज तपासण्यासाठी प्रशासनाने घेतल्या ताब्यात

नांदेड/प्रतिनिधी-वाडी पुयड येथील अवैध सावकारी करणारे गजानन प्रभाकर कदम विनापरवाना अवैध सावकारी व्यवहारासंबंधी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहकार विभाग व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने त्यांच्या घरावर व दुकानावर झडतीची कारवाई केली. या कारवाई दरम्यान कथित अवैध सावकारी व्यवहारांशी संबंधित संशयित हिशेब वह्या व दस्तऐवजांच्या प्रती पुढील चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

गैरअर्जदार गजानन प्रभाकर कदम, रा. वाडी पुयड, ता. जि. नांदेड यांच्याविरुद्ध दाखल तक्रारीच्या अनुषंगाने दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी ही तपासणी करण्यात आली. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम ३९ अन्वये गुन्हा क्रमांक १३९१/२०२६ नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाची कायद्यानुसार पुढील चौकशी करण्यात येणार आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व पोलीस अधीक्षक निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच लातूरचे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था नानासाहेब चव्हाण, सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे आणि नांदेड येथील उपनिबंधक, सहकारी संस्था किशन फिसके यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली. पोलिस विभागाचे संरक्षण आणि पंचांच्या उपस्थितीत ही कारवाई पार पडली. अवैध सावकारी करणाऱ्या गजानन प्रभाकर कदम यांनी व्याजाने पैसे देवून शेतकऱ्यांची व नागरिकांची आर्थिक पिळवणूक केल्याचे जोरदार चर्चा आहे. नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी विनापरवाना सावकारी व्यवहार करणाऱ्या व्यक्तींबाबतची माहिती सहकार विभागाच्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था तथा जिल्हा निबंधक (सावकारी), नांदेड कार्यालयाकडे किंवा संबंधित तालुक्यातील सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडे गोपनीय स्वरूपात द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



औरंगाबाद पदवीधर विधानपरिषदेच्या निवडणुकीतील मतमोजणीला छत्रपती संभाजीनगर येथील रेसोनेट लॉजिस्टिक्स एलएलपी येथे सकाळी ८ वाजता निवडणूक निरिक्षक माधवी खोडे-चावरे, निवडणूक निर्णय अधिकारी जी.श्रीकांत, उमेदवार व मतमोजणी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला आहे.

## खर्गेंच्या विधानावर काँग्रेसमध्येच नाराजी

मुंबई/प्रतिनिधी-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे राजकीय वातावरण तापले आहे. भाजप आणि मित्रपक्षांकडून खर्गे यांच्यावर टीकेची झोड उठवली जात असतानाच, आता काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही त्यांच्या विधानावर आक्षेप नोंदवला आहे. राजकीय नेत्यांनी कोणत्याही पक्षाचे असले तरी बोलताना शब्दांची निवड काळजीपूर्वक करावी आणि भाषेचा संयम राखावा, असे मत चव्हाण यांनी व्यक्त केले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राहुल गांधी यांच्याबाबत केलेल्या विधानाचाही संदर्भ देत चव्हाण यांनी राजकीय नेत्यांच्या वक्तव्यांवर नाराजी व्यक्त केली. भाजप असो किंवा काँग्रेस, कोणत्याही पक्षाच्या नेत्यांनी सार्वजनिक व्यासपीठावर बोलताना मर्यादा पाळणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. खर्गे यांच्या विधानाचे समर्थन करण्याऐवजी चव्हाण यांनी संयमाची भूमिका मांडल्याने काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांची चर्चा सुरू झाली आहे.दरम्यान, खर्गे यांच्याकडून चूक झाली असल्यास ते स्वतःच त्याबाबत स्पष्टीकरण देतील, असे सांगत चव्हाण यांनी या प्रकरणावर सावध भूमिका घेतली.

## एमआयडीसीत मे.शिवगंगा ऑईल मिलवर एफडीएची धाड

### २०.९९ लाखांचे संशयित भेसळयुक्त खाद्यतेल जप्त

नांदेड/प्रतिनिधी-अन्नपदार्थांतील संभाव्य भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने रविवार दि.२६ ऑक्टोबर रोजी नांदेड येथील औद्योगिक वसाहतीतील मे. शिवगंगा ऑईल मिल या खाद्यतेल उत्पादक पेढीवर छापा टाकून ९ हजार ७४४ किलो संशयित भेसळयुक्त खाद्यतेलाचा एकूण २० लाख ९९ हजार ५०७ रुपये किमतीचा साठा जप्त केला.

नांदेड एमआयडीसीतील डी-१९ येथे असलेल्या मे. शिवगंगा ऑईल मिल या पेढीवर मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही संयुक्त कारवाई करण्यात आली. यावेळी विक्रीसाठी उत्पादित केलेल्या डबल फिल्टर्ड शेंगदाणा तेल, परिष्कृत सोयाबीन तेल आणि परिष्कृत सूर्यफूल तेल या खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. या खाद्यतेलात भेसळ असल्याच्या संशयावरून संबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई छत्रपती संभाजीनगर येथील सहआयुक्त श्री. करकाळे यांच्या निर्देशानुसार आणि सहायक आयुक्त (अन्न), नांदेड परिमंडळ सु. दा. जिंतुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात गुप्तवार्ता विभाग, छत्रपती संभाजीनगरचे अन्न सुरक्षा अधिकारी योगेश चिभडे तसेच नांदेडचे अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अ. के. दुधाटे आणि स. वि. कनकावाड यांचा समावेश होता. अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे खाद्यतेलात भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. नागरिकांना सुरक्षित



आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्नपदार्थांची गुणवत्ता आणि सुरक्षितता तपासण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

# दहा हजारांच्या कर्जासाठी शेतकऱ्याचा बळी?

**दुष्काळ, बाजारभावाचा अभाव आणि खासगी वसुलीचा विळखा यांसारख्या संकटांतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्याची जबाबदारी शासनाचीच आहे.शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे भाषणातून वारंवार सांगितले जाते. मात्र, त्याच शेतकऱ्याला जगण्यासाठी दहा हजार रुपयांचे कर्ज घ्यावे लागते आणि त्या कर्जाच्या वसुलीसाठी त्याला गावातून उचलून फायनान्स कंपनीच्या कार्यालयात आणले जाते, ही बाब केवळ धक्कादायक नाही, तर आपल्या व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील माळकौठा परिसरातील अल्पभूधारक शेतकऱ्याच्या मृत्यूच्या घटनेने खासगी कर्जवसुलीच्या पद्धती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक असुरक्षिततेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.उपलब्ध माहितीनुसार, या शेतकऱ्याने एका खासगी फायनान्स कंपनीकडून दहा हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जवसुलीसाठी त्याला गावातून कंपनीच्या कार्यालयात आणण्यात आले. दुसऱ्या दिवशी कंपनीच्या कार्यालय परिसरात त्याचा मृतदेह आढळला. सुरुवातीला आत्महत्येची शक्यता व्यक्त करण्यात आली; मात्र, नातेवाइकांनी आक्षेप घेतल्यानंतर आणि गावकऱ्यांनी कंपनीसमोर संताप व्यक्त केल्यानंतर खुनाचा गुन्हा दाखल झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणातील मृत्यूचे नेमके कारण, संबंधितांची भूमिका आणि घडलेल्या घटनाक्रमाचा उलगडा निष्पक्ष तपासातूनच झाला पाहिजे. आरोपांच्या आधारे कोणालाही दोषी ठरवता येणार नाही; परंतु या घटनेतील प्रत्येक बाबीची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.प्रश्न केवळ दहा हजार रुपयांचा नाही. प्रश्न आहे तो एका शेतकऱ्याच्या जगण्याचा, त्याच्या प्रतिष्ठेचा आणि कर्जवसुलीच्या नावाखाली माणुसकीची मर्यादा ओलांडली जाते आहे का, याचा. कर्ज घेतले म्हणजे कर्जदाराचे सर्व अधिकार संपतात का? वसुली करण्याचा अधिकार आहे म्हणून एखाद्याला त्याच्या इच्छेविरुद्ध कार्यालयात आणणे, दबाव टाकणे किंवा अपमानास्पद वागणूक देणे योग्य ठरते का? कर्जवसुली कायद्याच्या चौकटीतच झाली पाहिजे. धमकी, जबरदस्ती किंवा बेकायदेशीर दबावतंत्राला कोणत्याही परिस्थितीत समर्थन देता येणार नाही.एका बाजूला दुष्काळाचे सावट, दुसऱ्या बाजूला शेतमालाला अपेक्षित बाजारभाव नाही. उत्पादन खर्च वाढतो आहे, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीसाठी पैसा खर्च करावा लागतो आहे. निसर्गाची साथ मिळाली नाही तर पीक हातचे जाते; पीक आले तरी बाजारात योग्य भाव मिळेल याची खात्री नसते. अशा परिस्थितीत अल्पभूधारक शेतकऱ्याचे आर्थिक गणित कोलमडते. घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि शेतीचा पुढील हंगाम या सगळ्यांची जबाबदारी त्याच्यावर असते. उत्पन्न अनिश्चित आणि खर्च निश्चित, अशा कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्याला छोट्या रकमेसाठीही खासगी कर्जाचा आधार घ्यावा लागतो.ही परिस्थिती एका शेतकऱ्यापुरती मर्यादित नाही. ग्रामीण भागात तातडीच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी खासगी वित्तसंस्थांकडे वळणाऱ्यांची संख्या कमी नाही. प्रत्येक वित्तसंस्था चुकीचीच आहे, असा सरसकट निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. मात्र, कर्ज देताना आणि वसुली करताना नियमांचे पालन होते की नाही, यावर प्रभावी नियंत्रण असणे गरजेचे आहे. वसुली प्रतिनिधींच्या वर्तनावर देखरेख, तक्रारींचे तातडीने निराकरण आणि बेकायदेशीर दबाव टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा आर्थिक अडचणीत सापडलेल्या माणसाची असहायता हाच काहींसाठी वसुलीचा मार्ग ठरू शकतो.या घटनेतून शासन आणि प्रशासनाला काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. शेतकऱ्यांना संस्थात्मक कर्ज सहज उपलब्ध होते का? अल्पभूधारकांसाठी असलेल्या कर्जयोजना प्रत्यक्षात किती परिणामकारक आहेत? दुष्काळी परिस्थितीत पीक कर्ज, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत आणि इतर मदतीचा लाभ वेळेत मिळतो का? केवळ योजना जाहीर करून शेतकऱ्यांच्या अडचणी दूर होत नाहीत. योजनांचा लाभ शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने सक्रिय भूमिका घेतली पाहिजे.माळकौठा येथील मृत्यू प्रकरणाचा तपास निष्पक्ष आणि कालमर्यादेत झाला पाहिजे. घटनास्थळावरील पुरावे, सीसीटीव्ही चित्रण, संबंधितांचे जबाब आणि उपलब्ध वैद्यकीय पुरावे तपासून सत्य समोर आणले पाहिजे. दोष सिद्ध झाल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी. त्याचबरोबर जिल्ह्यातील खासगी वित्तसंस्थांच्या वसुली पद्धतींची तपासणी करून नियमबाह्य प्रकार आढळल्यास तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे.शेतकऱ्याला संकटातून बाहेर काढणे ही केवळ त्याच्या कुटुंबाची जबाबदारी नाही. शेतीला परवडणारे दर, वेळेवर आर्थिक मदत, सुलभ संस्थात्मक कर्ज, प्रभावी पीकविमा आणि दुष्काळात ठोस आधार देणे ही शासनाची जबाबदारी आहे. शेतकऱ्याच्या अडचणींचा फायदा घेऊन त्याच्यावर अन्याय होणार नाही, याची खबरदारी प्रशासनाने घेतली पाहिजे.दहा हजार रुपयांच्या कर्जासाठी एका शेतकऱ्याचा मृत्यू होण्याची वेळ येत असेल, तर विकासाच्या दाव्यांसोबत ग्रामीण वास्तवाचाही हिशेब मांडला पाहिजे. शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम, संकटात आधार आणि कर्जवसुलीत सन्मान मिळणे ही दया नव्हे, तर त्याचा अधिकार आहे. माळकौठा येथील घटनेचे सत्य बाहेर आलेच पाहिजे; पण त्यापलीकडे जाऊन अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी शासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत. शेतकऱ्याला जगण्याची उमेद देणारी व्यवस्था निर्माण करणे, हीच या घटनेतून घेण्याची खरी शिकवण आहे.**

# सह्याद्री वाचवा,महाराष्ट्राची ओळख जपवा!



सह्याद्री म्हणजे केवळ डोंगररांग नव्हे; तो महाराष्ट्राच्या अस्मितेचा, निसर्गवैभवाचा आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा जिवंत वारसा आहे. हिरव्यागार वनराईने नटलेले डोंगर, खोल दऱ्या, खळाळते झरे आणि जैवविविधतेने समृद्ध असलेला हा परिसर महाराष्ट्राच्या निसर्गसौंदर्याचे खरे वैभव आहे. मात्र, विकासाच्या नावाखाली याच निसर्गसंपदेवर घाव घातले जात असतील, तर विकासाच्या संकल्पनेवरच आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

कर्जत तालुका आणि भीमाशंकर परिसरातील वृक्षतोडीबाबत वृक्षप्रेमींकडून व्यक्त होणारी चिंता ही केवळ झाडांच्या अस्तित्वापुरती मर्यादित नाही. हा प्रश्न आहे निसर्गाच्या संतुलनाचा, भावी पिढ्यांच्या सुरक्षिततेचा आणि महाराष्ट्राच्या पर्यावरणीय वारशाच्या संवर्धनाचा.त्यामुळे या परिसरातील वृक्षतोडीच्या तक्रारींची तातडीने निष्पक्ष चौकशी करून, अनावश्यक आणि बेकायदेशीर वृक्षतोड थांबविणे आवश्यक आहे. विकास हवा; पण निसर्गाच्या विनाशाची किँमत मोजून नव्हे!आज रस्ते, इमारती, उद्योग आणि पायाभूत सुविधा या विकासाच्या गरजा आहेत. परंतु विकास म्हणजे केवळ सिमेंट-काँक्रीटच्या रचना उभारणे नव्हे. माणसाला जगण्यासाठी शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, सुपीक जमीन आणि निसर्गाचे संतुलनही आवश्यक आहे. झाडे तोडून उभारलेले प्रकल्प विकासाचे प्रतीक ठरू शकतील; पण त्या विकासातून निसर्गाचे नुकसान होत असेल, तर त्याच्या दीर्घकालीन परिणामांचा विचार कोण करणार? झाडे माती घट्ट धरून ठेवतात, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत करतात, अनेक जीवांना निवारा देतात आणि वातावरणातील कार्बन शोषून हवामानाचे संतुलन राखण्यास हातभार लावतात.वृक्षतोडीमुळे या नैसर्गिक प्रक्रियांवर परिणाम होऊ शकतो. विशेषतः सह्याद्रीसारख्या संवेदनशील डोंगराळ प्रदेशात जंगलांचे नुकसान झाल्यास मृदा धूप, पाण्याच्या प्रवाहातील बदल आणि जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते.भीमाशंकर हा परिसर धार्मिक श्रद्धेबरोबरच वनसंपदा आणि जैवविविधतेसाठीही महत्त्वाचा आहे. अशा परिसराचे जतन करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही; ती समाजाचीही सामूहिक बांधिलकी आहे. आपल्या संतांनी आणि महापुरुषांनी निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी आपल्याला फार पूर्वीच दिली आहे.जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी वृक्षवल्लींना सोयरे मानून निसर्गाशी असलेले आपले आत्मीय नाते अधोरेखित केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वृक्षसंवर्धनविषयक धोरणांमधूनही निसर्गसंपदेबद्दलची जबाबदारी आणि दूरदृष्टी दिसून येते. या परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या महाराष्ट्रात झाडांकडे केवळ लाकूड किँवा अडथळा म्हणून पाहणे, ही आपल्या सांस्कृतिक मूल्यांशी विसंगत बाब ठरेल.आज प्रश्न एवढाच आहे की, आपण संतांचे विचार आणि महापुरुषांचे आदर्श केवळ भाषणांत जपणार आहोत, की प्रत्यक्ष कृतीतूनही त्यांचे पालन करणार आहोत? वृक्षतोडीला पर्याय शोधणे, प्रकल्पांचे पर्यावरणीय परिणाम गांभीर्याने तपासणे, आवश्यक त्या परवानग्यांची पारदर्शकता राखणे आणि तोडलेल्या झाडांच्या जागी केवळ औपचारिक वृक्षारोपण न करता जगणारी, स्थानिक प्रजातींची झाडे वाढविणे, ही काळाची गरज आहे. कारण एका जुन्या वृक्षाची जागा नव्याने लावलेले रोप तात्काळ घेऊ शकत नाही. जंगल ही केवळ झाडांची संख्या नसते; ती अनेक वर्षांत विकसित झालेली एक जिवंत परिसंस्था असते. शासन, प्रशासन, विकासक आणि नागरिक यांनी एकत्र येऊन सह्याद्रीच्या संवर्धनासाठी ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे.पर्यावरणविषयक नियमांचे काटेकोर पालन, वृक्षतोडीच्या तक्रारींची त्वरित दखल आणि संवेदनशील क्षेत्रांमध्ये निसर्गाला कमीत कमी हानी पोहोचविणाऱ्या विकासाला प्राधान्य, या बाबींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.शेवटी, आपण पुढच्या पिढीला नेमका कोणता महाराष्ट्र देणार आहोत, हा प्रश्न स्वतःला विचारायला हवा. डोंगरांच्या जागी उजाड माळराने, आटणारे जलस्रोत आणि हरवलेली वनसंपदा, की हिरवाईने नटलेला, जैवविविधतेने समृद्ध आणि पर्यावरणीयदृष्ट्या सुरक्षित सह्याद्री? सह्याद्री टिकला, तर त्याचे निसर्गवैभव टिकेल; निसर्ग टिकला, तरच मानवी जीवनाचे भविष्य सुरक्षित राहील. म्हणूनच कर्जत तालुका आणि भीमाशंकर परिसरातील वृक्षतोडीच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून निसर्गाच्या रक्षणासाठी तातडीने पावले उचलली पाहिजेत. विकासाच्या प्रत्येक निर्णयात पर्यावरणाचा विचार असला पाहिजे. कारण निसर्गाचे रक्षण करणे म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे, तर विकासाला शाश्वत भविष्य देणे होय.

सह्याद्री ही महाराष्ट्राची ओळख आहे. ती केवळ नकाशावर नव्हे, तर प्रत्यक्ष निसर्गात जिवंत राहिली पाहिजे. झाडे वाचविणे ही आजची गरज आहे आणि उद्याच्या पिढ्यांप्रती असलेले आपले नैतिक कर्तव्यही!

**पंडित पवळे**
शिक्षणयोगी,नांदेड.

# जातीभेद मिटविणे आहे...



जात...एका तिसऱ्या, चौथ्या वर्गात असलेल्या मुलीनं आपल्या शिक्षिकेला त्यांची जात विचारली. त्याचं त्या शिक्षिकेला वाईट वाटलं. हे असं का घडलं? विचार आला. कदाचित ह्या जातीवरुन विषय तिच्या घरी बोलले जात असावेत. कधी परीसरात बोलले जात असावेत तर कधी एखाद्या व्यक्तीनं तिला तिच्या शाक्षिकेची जात विचारायला लावली असावी. असंही होवू शकते. मात्र अशी प्रकरणं शाळेत नेहमी घडत असतात. मुलं शिक्षकांनाच नाही तर आपल्या समवयस्क मित्रांनाही जात विचारु शकतात. जी सांगीतल्यावर जातीभेदाची भावना मनात निर्माण होवू शकते. जी जातीभेदाची भावना एकदा मनात निर्माण झाली की आयुष्यभर मनातून जायचा विचारच करीत नाही. त्यामुळंच जात व जातीभेद ह्या दोन्ही गोष्टी आजच्या काळात गंभीर स्वरुपाच्या झाल्या आहेत. यात शंका नाही.कुणालाही कुणाची जात विचारणे हा गुन्हाच. असे असतांना अगदी वयात न आलेली चिमूरडी मुलं जर जात विचारत असतील तर त्याला काय म्हणता येईल? शाळेत शिक्षक शाळा प्रवेश करतांना जात विचारत असतील तर त्याला काय समजावे?

जात विचारणे हा गुन्हाच. म्हणूनच ती मिटविणे आहे व जातीवरुन होणारा भेदभावही मिटविणे आहे. असे डॉक्टर भिमराव रामजी आंबेडकर उर्फ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. ते जर थोडेसे जास्त दिवस जगले असले तर त्यांनी जातच मिटवून टाकली असती. परंतु असं घडलं नाही. मात्र त्यांच्या प्रयत्नातून जात नाही, परंतु जातीभेद मिटला. हे तेवढंच खरं आहे. आज थोड्याफार प्रमाणात आहे. परंतु पाहिजे तेवढ्या प्रमाणात नाहीच. आज व्यक्ती कुठेही प्रवास करु शकतो. कोणासोबतही खावू पिऊ शकतो.जातीभेद थोड्याठार प्रमाणात का होईना, मिटला. परंतु जात ही व्यक्तीला चिकटलेलं बांडगूळ आहे. ती कशी मिटणार? त्याचं कारण आहे जातीचा प्रवास. आजच्या काळात जातीच्या प्रवासाची गोष्ट मनोरंजकच आहे. जात माणसाला चिकटते जन्मावरुन. जन्मापुर्वी कोणत्याही व्यक्तीला त्याची जात माहित नसतेच. आजच्या काळात व्यक्ती जेव्हा जन्म घेतो. तेव्हाही त्याला जात माहित नसते. परंतु तो जेव्हा शाएत प्रवेश करतो. तेव्हा शिक्षक त्याच्या मायबापाला त्याची जात विचारतात. मग तीच जात दाखल्यात लिहिली जाते व त्या मुलाची आजपर्यंत जी जात असते. ती जात नोंदली जाते. पुढे याच जातीवरुन सवलती सुरु होतात. अमूक मुलगा या जातीचा असेल तर त्याला विशेष सवलत, शिष्यवृत्तीही. इथूनच जातीभेदाची पाळेमुळे जन्म घेत असतात. ज्यातून अशी सवलत मिळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबत इतर सवलत न मिळणाऱ्या मुलांमध्ये तिरस्काराची भावना निर्माण होते. जी तिरस्काराची भावना एवढी मनात घर करते की ती भावना त्याच्या मरणापर्यंत त्याच्या मनातून जात नाही.

शाळा हे असं विचारपीठ आहे की तेथून संस्कार केले जातात. संस्कार प्रसवले जातात. जातीवरुन जातीभेद कुणीही करु नये. हा एक संस्कारच. जो शाळेतून केला जातो. परंतु हे जरी खरं असलं तरी मनात इच्छा नसतांना शिक्षकांना त्या मुलांचं शाळेत नाव दाखल करतांना नाईलाजास्तव त्या मुलांची जात विचारावी लागते. जी जात एकदा का त्याच्या शाळेत त्याच्या नावासमोर दाखल झाली की त्याला आयुष्यभर चिकटून राहाते. याचाच अर्थ असा की जी कधीच जात नाही आयुष्यातून. तिलाच जात असं नाव आहे.जातीभेद करु नये. असे म्हटल्यास आजच्या काळात आतिशयोक्तीच ठरेल. कारण आजच्या काळात जातीभेद दिसत नाही. तो मोडलेला दिसत आहे. हे आपल्या वागण्याच्या पद्धती, आपला आहार, विहार यावरुन दिसून येते. तरीही काही बागूलबुवे आजच्या काळातही जातीभेद करतांना दिसतात. असा केल्या जाणारा जातीभेद हा उघडपणे दिसून पडत नाही. मात्र तो जवळपास अंतर्मनातून दिसून पडतोच.परीवर्तन हा सुष्टीचा नियम आहे. तसं आजारातही परीवर्तन होतंच. काल लोकांच्या अंगावर येणारे देवीचे पुरळ आज जवळपास कमी झालेले दिसतातच. त्यातच कालचे प्लेग, पोलिओ, डांग्या खोकला, एड्स सारखे आजार आज दिसत नाहीत. ते हद्दपार झाले आहेत. परंतु त्याची जागा गतकाळात काही रोगांनी नक्कीच घेतलेली होती. काल साथीचे आजार यायचे व आज तसं दिसत नाही. अपवाद कोरोना. परंतु त्यावरही आपण आज मात केलेली आहे. तरीही आजार थांबले नाहीत. नव्यानं, नवीन नावाने ते येतातच आणि येतीलही.

परीवर्तनाबद्दल आणखी सांगायचं झाल्यास परीवर्तनवादी याच नियमानुसार प्रत्येक मनुष्य जन्म घेतो व तो मरण पावतो. त्याच्या जीवन जगण्याचा काळ हा ठरलेला असतो. असं जीवन जगत असतांना प्रत्येक जीवाला लोभ सुटतो. मग तो राहण्यासाठी जागा विकत घेतो. त्या जागेत अधिवास करीत असतांना माझी, माझी करीत तो सदैव भांडत असतो. परंतु ती जागा ही त्याची नसते नव्हे तर हे जगही त्याचं नसतं. त्याचा जन्म एखाद्या किरायेदारासारखा या धरेवर झालेला असतो. शेवटी जेव्हा तो व्यक्ती मरण पावतो. तद्नंतर ती मालमत्ता दुसऱ्याचीच होते. ती मालमत्ता त्याची राहात नाही. परंतु लोभ किती असतो, ते सांगायला नकोच. तसंच भेदभावाचं आहे.भेदभावातही परीवर्तन झालं. काल जो विटाळ होता. तो आज नाही. आज काळ बदलला व पाश्चात्य विचारसरणीचे लोकँआपल्या भारतीयांच्या संपर्कात आले. आज गळ्याला गाडगा व कमरेला झाडू नाही. अन् कोणताच व्यक्ती तसं सांगत नाही. सांगू शकत नाही. याचं कारण आहे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. डॉक्टर बाबासाहेबांनी सक्षम व सशक्त असं संविधान बनवलं व ते देशाला दिलं. ज्या संविधानातील कलमानुसार कोणालाही कोणाच्याही अधिकारांचं हनन करता येत नाही. कोणालाही स्वतंत्र विचार करण्याचा अधिकार आहे. कोणालाही स्वतःचं स्वतंत्र मत मांडण्याचा अधिकार आहे. स्वतंत्र वावरण्याचा अधिकार आहे. त्यातच तो स्वतःचा स्वतंत्र असा कोणताही व्यवसाय करु शकतो. अन् चार पाच मजली इमारतीही बांधू शकतो. त्यातच कोणालाही कोणाची जात विचारण्याचा अधिकार नाही आणि ती जात माहित झाल्यावर त्याच्यापासून दूर राहण्याची मुभा नाही. असे असतांना आजही बरीच क्ट्रसिटीची प्रकरणे उद्भवतात. त्याचं कारण काय आहे? त्याचं कारण आहे, भेदभाव करणे. जातीअंतर्गत अपशब्द वापरणे. कोणाचीही जात विचारणे. याबाबतीत एक उदाहरण आहे.

एक शाळेतील लहानग्या वर्गात शिकणारी मुलगी. तिला धड वाचताही येत नव्हतं. परंतु तिनं आपल्या मॅडमला तिची जात विचारुनच टाकली. याला काय म्हणावं? कदाचित त्या मुलीच्या घरुन तिला सांगीतलं गेलं असेल की मॅडमची जात विचारुन यावे? कदाचित तिच्याच वर्गातील इतर मुलांनी मॅडमची जात विचारायला लावलं असावं? किँवा कोणी एखाद्या भामट्यानं तिला त्या मॅडमची जात विचारायला लावलं असावं? किँवा कदाचित तिनंच जात विचारली असावी? प्रकरण साधं आहे. परंतु ते साधं जरी वाटत असलं तरी गंभीर आहे.वर्गातील मुलं. वर्गातील मुलं ही कोणतेही प्रश्न विचारु शकतात की त्याची कल्पनाच आपण करु शकत नाही. एक तिसरी चौथीतील मुलगी सहजच एका शिक्षकाला म्हणाली, सर, आपण एससी आहात ना? जात...जात मिटविणे आहे. हे आपण फक्त वरवरच बोलतो. परंतु शाळेच्या वर्गगोल्यातून जातीबद्दलच्या अशा गोष्टी नित्य चालत असतात. याचं कारण घरचं वातावरण. घरी वा परीसरात आजही जातीच्या गोष्टी सुरु असतात. मुलं त्या गोष्टी अगदी कान देवून ऐकतात. मग त्यांनाही वाटतं की कदाचित आपण आपल्याच शिक्षकांऑआ त्यांची जात विचारुन पाहावं व ते विचारताच. ज्यातून अशा शिक्षकांना त्यांची जात विचारल्यास आनंद वाटत नाही. वाईट वाटतं. त्या प्रकरणाची व त्या विद्यार्थ्यांची चीड येते. रागवावसं वाटतं. परंतु नाईलाज असतो. त्याचं कारण असते, समज. ती जात विचारणारी मुलं एवढी परीपक्व झालेली नसतात की त्यांना तसं विचारण्याचे गंभीर परीणाम माहित असू शकतील.म्हटलं जातं की कुणाचीही जात विचारु नये. कारण जात विचारणे हा गुन्हाच आहे. असं असतांना आजच्या परीवर्तनवादी काळातही कुणीही कुणाचीही जात विचारतात. दोन कामाला जाणाऱ्या साध्या मोलकरणी एकमेकींना जात विचारुन मोकळे होतात. मग एखाद्याची जात माहित झालीच की शेंबडी उच्च जातीची महिला, आपल्यापेक्षा कितीतरी पटीनं शुद्ध व सात्त्विक राहणाऱ्या कनिष्ठ वर्णीय महिलेबद्दल तुच्छता बाळगतांना दिसतते. आज मोठमोठ्या सरकारी कार्यालयातही अगदी तेच घडतं. जात विचारणे व जात माहित झाल्यास भेदभाव करणे. हा भेदभाव उघडपणे दिसत नाही. अर्थात बोलण्यातून दिसत नाही. परंतु कृतीतून सर्रासपणे नजरेस दिसून येतो. जात...जात मिटवायच्या गोष्टी देवांनीही केल्या. ज्ताला कोणी दंतकथेचं रुपक देतात. भगवान विष्णूनं त्रेता युगात रामाचा अवतार घेतल्याचं म्हटलं आहे. रामाचा जन्म क्षत्रीय कुळातील. याचाच अर्थ राम हा क्षत्रीय. अन् याच रामानं शबरी नावाच्या एका अछूत स्त्रीच्या हातची उष्टी बोरं खाल्ली. यावरुन त्यांनी जातपात मानली नाही, असा त्याचा अर्थ होतो. त्यानंतर त्याच विष्णूनं द्वापर युगात यादवाच्या घरी जन्म घेतला. ज्यातून क्रिष्ण यादव ठरले. अर्थात यादव म्हणजे ओबीसी. तद्नंतर हेच क्रिष्ण भगवान अछुतानंदच्या रुपात वावरले. ज्यातून ते अछूतही बनले. याचाच अर्थ त्यांनीही जातपात पाळली नाही,असा त्याचा अर्थ होतो. एवढंच नाही तर संत चोखामेळा पंढरपूरच्या दर्शनाला जायचे व विठ्ठलाच्या चरणी माथा टेकवायचे. याचाच अर्थ असा की प्रत्यक्ष विठ्ठलानेही जातपात पाळली नाही. तसंच प्रत्यक्ष ज्या राम व क्रिष्णाला आपण देवाचा दर्जा दिला. देव मानलं. त्याच देवांनी जातीभेद पाळली नाही, मानली नाही. मग आपण जात पात पाळणारे व अमूक व्यक्ती अमूक अमूक जातीचा, असे मानणारे व त्यावर आधारीत भेदभाव करणारे कोण? आपणही जातपात पाळू नये. कोणाची जात विचारु नये. कोणाच्या जातीबद्दल हिनता मनात बाळगू नये. कारण जात ही कुणाच्या हातात नसते. प्रत्येक माणूस जेव्हा जन्म घेतो. तो जन्म घेण्यापुर्वी त्याला त्याची जात माहित नसतेच. तो जन्म घेतो. तरीही त्याला जात माहित होत नाही. ती त्याला तेव्हापर्यंत माहित होत नाही. जेव्हापर्यंत तो सज्ञान होत नाही. जात त्याची पहिल्यांदा नोंद होते शाळेत. अन् ती आयुष्यभर चिकटूनच राहाते. जात मिटविणे आहे. जातीभेद मोडणे आहे. ही सर्व संत महात्म्यांची व थोरांची वक्तव्ये. जात मिटू शकते व जातीभेद मोडलाही जावू शकतो. परंतु तो तेव्हा मोडेल. जेव्हा शाळेत मुलं दाखल करतांना त्याची जातच त्याच्या नावासमोर लिहिली जाणार नाही, तेव्हा. परंतु सध्याच्या काळात सवलती मिळविण्यासाठी त्या विद्यार्थ्यांच्या नावासमोर जात असणे अनिवार्य आहे. ज्यातून त्याची तीच खरी जात आहे काय? हे तपासण्यासाठी जात पडताळणीही अनिवार्य केलेली आहे. मग जात मिटेलच कशी आणि जातीभेद मोडेल कसा?जात मिटेल कशी व जातीभेद मोडला जाणार कसा? जात मोडण्यासाठी व मिटविण्यासाठी आपल्या पुर्वजांनीही अगदी देवरुप धारण करुन प्रत्यक्षात प्रयत्न केला. मग ते भगवान राम असो, क्रिष्ण असो वा आताचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर असो की ज्यांनी संविधान लिहिलं जातीभेद मोडण्यासाठीच. परंतु जात मिटली नाही आणि जातीभेदही दूर गेला नाही. कारण त्याच संविधानातून आरक्षणाचं पिल्लू जन्माला आलं. ज्या पिल्लूच्या मदतीनं काही स्वार्थी लोकांनी जात मिटू दिली नाही. त्यामुळंच जात कधीच मिटवली जाणार नाही. ज्यातून जातीभेदही मिटणार नाही. तो वरवर मिटलेला दिसेल. परंतु अंतर्मनात तसाच राहिल, धुमसत. एखाद्या भुकँप्राच्या ज्वालामुखीसारखा. जसा लाव्हारस जमीनीतच धुमसत असतो व तो लाव्हारस अधू भाग शोधत असतो. जिथं अधू भाग दिसला की तोच लाव्हारस भुकँप म्हणून जमीनीच्या बाहेर येतो व परीसराची हानी करुन टाकतो. शहरंची शहरं उध्वस्त करतो. हा जातीभेदही अगदी तसाच आहे. तोही लाव्हारसासारखा संधी शोधतो व एखाद्यावेळेस लोकांची विचारशक्ती अधू झाली की तो एखाद्यावेळेस लाव्हारसासारखाच अचानक वर येतो. ज्यातून भुकँप जसे परीसराला हानी पोहोचवते. तसाच जातीभेद हाही परीसरातील मानसिकतेचं नुकसानच करीत असतो. जे आतापर्यंत घडलेलं आहे. घडत आलेलं आहे. जातीभेद हा कधीच जाणार नाही. जेव्हापर्यंत जित असेल. जात जेव्हा मिटैल. तेव्हाच जातीभेद जाईल. कारण जात व जातीवरुन भेद. हे दोन्ही घटक एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यात शंका नाही. त्यामुळंच तो मिटवायचा असेल तर जात मिटवणे गरजेचे. जी जात शाळेतूनच मिटवली जावू शकते. शाळा प्रवेश घेतांना लिहिली नाही तर...

**अंकुश शिंगाडे**
नागपूर

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाउंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# इसापूर उजव्या कालव्याचे रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सिंचन नियोजन जाहीर

## दोन्ही हंगामांत प्रत्येकी दोन पाणीपाळ्या;पहिली पाणीपाळी १ नोव्हेंबरपासून सुरु होणार

नांदेड/प्रतिनिधी-उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर उजव्या कालव्याद्वारे सन २०२६-२७ या वर्षातील रब्बी व उन्हाळी हंगामासाठी प्राथमिक सिंचन कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार दोन्ही हंगामांत प्रत्येकी दोन पाणीपाळ्या सोडण्याचे नियोजन करण्यात आले असून, रब्बी हंगामातील पहिली पाणीपाळी १ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार अल निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण करण्यात आले आहे. त्यानंतर उपलब्ध राहणाऱ्या पाणीसाठ्याच्या आधारे रब्बी व उन्हाळी हंगामाचा प्राथमिक सिंचन कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. धरण जलाशय, अधिसूचित नदी-नाले आणि मुख्य कालव्यावरील मंजूर उपसा सिंचन योजनांच्या लाभधारकांनाही या नियोजनानुसार पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सन २०२६-२७ मधील रब्बी व उन्हाळी हंगामातील पाणीपाळ्यांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. रब्बी हंगाम २०२६-२७ साठी पहिली पाणीपाळी दि. १ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२६ (२४ दिवस), दुसरी पाणीपाळी दि. २० डिसेंबर २०२६ ते १३ जानेवारी २०२७ (२४ दिवस) याप्रमाणे राहील. उन्हाळी हंगाम २०२६-२७ साठी पहिली पाणीपाळी दि. १ मार्च ते २४ मार्च २०२७ (२४ दिवस) तर दुसरी पाणीपाळी दि. २० एप्रिल ते १४ मे २०२७ (२४ दिवस) याप्रमाणे राहील. पाऊस, तांत्रिक अडचणी किंवा अन्य आकस्मिक कारणांमुळे पाणीपाळ्यांच्या निर्धारित तारखांमध्ये बदल होऊ शकतो. पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणास प्राधान्य देण्यात आले असून, आवश्यकतेनुसार पाणीपाळीच्या कार्यक्रमात बदल करण्याचे अधिकार सनियंत्रण समितीकडे राहतील. सिंचनासाठी कालव्याचे प्रवाही पाणी, मंजूर उपसा सिंचन योजना तसेच मंजूर जलाशय व नदी-नाल्यांवरील उपसा सिंचन योजनांद्वारे पाणी घेऊ इच्छिणाऱ्या लाभधारकांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. उपसा सिंचनासाठी अर्जासोबत संबंधित परवानगीची प्रत जोडावी. पिकांचे मागणी क्षेत्र २० आरच्या पटीत असणे आवश्यक आहे. तसेच लाभधारकांनी त्यांच्याकडील संपूर्ण थकित पाणीपट्टी भरलेली असावी. पाणीपाळीदरम्यान विनापरवानगी विद्युत मोटारी किंवा ट्रॅक्टरच्या साहाय्याने पाणी उपसा करणे अथवा कालव्याची द्वारे उघडणे यासारखे प्रकार आढळल्यास नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. पाणी वापर संस्थांकडे हस्तांतरित केलेल्या लाभक्षेत्रात पाणी मागणी, पाणीपट्टी वसुली आणि सिंचनाचे नियंत्रण संबंधित पाणी वापर संस्थेने करणे आवश्यक आहे.

## शॉर्ट सर्किटमुळे दोन शेतकऱ्यांचा ऊस जळून खाक

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड येथील दोन शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत जळून खाक झाल्याची घटना घडली. यामध्ये शेतकरी प्रवीण श्रीराम काचावर आणि अनिल विश्वनाथ काचावर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेप्रकरणी दोन्ही शेतकऱ्यांनी दि.२७ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालय, मुदखेड पोलीस ठाणे, येथे तक्रार केली आहे.

प्रवीण श्रीराम काचावर यांच्या गट क्रमांक ३६७ मधील ऊस शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत जळून खाक झाला. तसेच अनिल विश्वनाथ काचावर यांच्या गट क्रमांक ३७५ मधील ऊसही आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. त्यामुळे दोन्ही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.ऊस हे नगदी पीक असल्याने त्याच्या लागवडीपासून काढणीपर्यंत शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागतो. अशा परिस्थितीत उभे पीक जळून खाक झाल्याने संबंधित शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.या घटनेची संबंधित यंत्रणांनी पाहणी करून नुकसानीचा पंचनामा करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## वडिलांच्या डोक्यात कुऱ्हाडीचा घाव;मुलीसह जावयालाही मारहाण

देगलूर/प्रतिनिधी-घरासमोरील जागेत फरशी टाकण्याच्या कारणावरून निर्माण झालेल्या वादातून मंडगी येथे रक्तरंजित संघर्ष घडला. आठ जणांनी बळीराम भीमराव पाटील यांच्यावर कुऱ्हाड, काठी आणि दगडाने हल्ला केल्याची घटना घडली आहे.

महानंदा राजू पाटील (वय-३७), रा. कोटचीर, जि. निजामाबाद, तेलंगणा) या माहेरी मंडगी येथे आल्या होत्या. त्यांच्या वडिलांच्या घरासमोरील जागेत फरशी टाकण्यावरून नातेवाईकांमध्ये यापूर्वीही वाद झाला होता. यासंदर्भात देगलूर पोलिसात अदखलपात्र नोंद करण्यात आली होती. रविवार दि.२५ ऑक्टोंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास बळीराम पाटील यांनी संबंधित जागेत फरशी टाकण्यास विरोध केला. त्यानंतर आठ जण अंगणात येवुन वाद घालू लागले. वाद वाढल्यानंतर उमाकांत पाटील यांनी जीवे मारण्याची धमकी देत कुऱ्हाडीने बळीराम यांच्या डोक्यावर वार केला. अन्य आरोपींनी काठ्या व दगडाने मारहाण केली, तर दोघांनी त्यांच्या डोळ्यात मिरची पूड टाकली. यावेळी वडिलांना वाचवण्यासाठी महानंदा आणि त्यांचे पती राजू पाटील धावले असता, महानंदा यांच्या दोन्ही पायावर लाकडाने मारहाण करण्यात आली. त्यांना व त्यांच्या पतीलाही मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी हणमंत खुशाल पाटील, संग्राम पाटील, उमाकांत हणमंत पाटील, मन्याबाई हणमंत पाटील, महादेवी उमाकांत पाटील,(सर्व रा. मंडगी) तसेच शिवा राजू रेवपवार, वीरभद्र राजू रेवपवार, आणि बसवराज राजू रेवपवार (तिघे रा. कुरडगी) यांच्या विरुद्ध देगलूर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## उमरखेडमध्ये पाणी टंचाईने नागरिक त्रस्त;नगर परिषदेचे नियोजन कोलमडले



उमरखेड/प्रतिनिधी-शहरात मागील पाच ते सहा दिवसांपासून पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची मोठी वणवण सुरु आहे. बेलखेड बंधारा तांत्रिक कारणामुळे कोरडा पडल्याने शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. ऐनवेळी नळाला पाणी न आल्याने महिला, वृद्ध आणि लहान मुलांचे प्रचंड हाल होत असून दैनंदिन गरजांसाठी पाण्याची जुळवाजुळव करताना नागरिकांना नाकीनऊ येत आहे.

नागरिकांची ही गैरसोय लक्षात घेऊन भारतीय जनता पक्षाने तत्काळ मदतीचा हात पुढे केला आहे.आ.किसनराव वानखेडे आणि भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध प्रभागात मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.या उपक्रमात प्रभाग क्र.५ च्या नगरसेविका वंदना सचिन घाडगे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. केवळ आपल्या प्रभागापुरत्या मर्यादित न राहता त्यांनी संपूर्ण शहरातील पाणीटंचाईग्रस्त भागात टँकर पोहोचवले. त्यामुळे पाण्यासाठी त्रस्त झालेल्या नागरिकांना तात्पुरता का होईना, मोठा दिलासा मिळाला आहे.

> माझ्या प्रभागातील महिला, वृद्ध आणि लहान मुले पाण्यासाठी वणवण भटकत होती. जनता तहानलेली असताना लोकप्रतिनिधी म्हणून मी गप्प बसू शकत नाही. त्यामुळे नितीन भाऊ भुतडा यांच्या सहकार्याने संपूर्ण शहरात टँकरद्वारे मोफत पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न केला. नगर परिषद प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा पाणीटंचाई कायम राहिल्यास भारतीय जनता पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
>
> **- वंदना सचिन घाडगे,**
> नगरसेविका,प्रभाग क्र.५,भाजप,उमरखेड

## पुणे मतमोजणी केंद्रावर महाविकास आघाडी व महायुतीचे कार्यकर्ते भिडले

पुणे-पुण्यातील मतमोजणी केंद्रावर जेवण आत आणण्यावरून गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. जेवण आत आणण्यावरून महाविकास आघाडी आणि महायुतीचे कार्यकर्ते एकमेकांसोबत भिडल्याचे दिसून आले. मतदान केंद्रावर जेवण कसं आणू दिलं असा सवाल महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित केला, तर जेवणाचे बॉक्स आत आणताना दोन्ही कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाल्याचे दिसून आले.

पुण्यातील बालेवाडी स्टेडीअम परिसरात मतमोजणी प्रक्रिया पार पडत आहे. सकाळपासून पोलिसांकडून सर्वांना तपासून आतमध्ये सोडलं जात आहे, कडक सुरक्षा घटनास्थळी तैनात आहे. कोणतीही वस्तू, पेन, डायरी, गाडीच्या चाव्या, घड्याळ या सर्वांना आतमध्ये नेण्यास मनाई करण्यात आली होती, त्यानंतर आता जेवणाचे पॅकिंग असलेला एक ट्रक आतमध्ये आला, त्यावरून महाविकास आघाडी आणि महायुतीतील कार्यकर्ते एकमेकांसोबत भिडल्याचे दिसून येत आहे. तिथे बाचाबाची देखील कार्यकर्त्यांमध्ये झाली. तत्काळ पोलिस घटनास्थळी दाखल झाले, त्यानंतर जेवण घेण्यासाठी घटनास्थळी मोठी गर्दी झाली. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आरोप केला आहे, आम्हाला साधा पेन, पेपर, डायरी आतमध्ये घेऊन जाऊ दिलं नाही, मग जेवणाचा ट्रक आतमध्ये आला कसा असा सवाल महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत परिसरातील परिस्थिती योग्य प्रकारे हाताळली. पुण्यात ज्या ठिकाणी मतमोजणी सुरू आहे, तिथे पेन आणि कागद नेण्यास पोलिसांनी मज्जाव केला आहे, त्याचबरोबर घड्याळ, गाडीची चावी नेण्यावरून देखील काही उमेदवारांच्या प्रतिनिधी आणि पोलिसांमध्ये वाद झाला. पोलिसांच्या या धोरणावर अनेकांनी नाराजी व्यक्त केली. पुणे पदवीधरच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार असलेल्या हर्षदा देशमुख जाधव यांच्या काही प्रतिनिधींनी मतमोजणी केंद्रात आक्षेप घेतला होता. काही मतपेट्यांच्या सील केलेल्या तारा तुटल्याचे आणि लाखेचे सील नसल्याचे लक्षात आले. त्यावरती त्यांनी आक्षेप घेतला. निवडणूक आयोगाने त्याचा व्हिडिओ दाखवला जाईल असे स्पष्ट केले.

## आत्महत्याग्रस्त क्षीरसागर कुटुंबीयांना शिवसेनेची आर्थिक मदत

नांदेड/प्रतिनिधी-बोरगाव (तेलंग) येथे शेतकरी शंकर क्षीरसागर यांनी व्हिडिओ करत आत्महत्या केली होती. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेवून त्यांना धीर दिला आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत केली.

बोरगाव तेलंग येथील शेतकरी शंकर क्षीरसागर यांनी व्हिडिओ करुन टोकाचे पाऊल उचलले आणि गळफास घेतला. त्यांच्या निवासस्थानी जाऊन शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सांत्वनपर भेट घेतली व क्षीरसागर यांच्या परिवारासोबत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी संवाद साधला. यावेळी शेतकरी कुटूंबाला शिवसेनेच्या वतीने आर्थिक सहकार्य करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, युवासेना विभागीय सचिव महेश खेडकर, शिवसेना तालुकाप्रमुख सुनील पाटील कदम, उपजिल्हासंघटक माधवराव पांचाळ, माजी जि.प. सदस्य बाळगिर महाराज गिरी, माजी पं.स.सदस्य वसंतराव डुकरे, तालुकासंघटक नवनाथ पाटील जोगदंड, शिवसेना उपतालुकाप्रमुख पुरभाजी जाधव पासदगावकर, उपतालुकाप्रमुख हरिभाऊ धुमाळ, मारोतराव कदम, गणेश भोसले, सौरभ देवकते, पावडेवाडी शाखाप्रमुख सुरेश पावडे, दर्यापूर शाखाप्रमुख शिवाजीराव सूर्यवंशी, वाघी शाखाप्रमुख प्रकाशराव जानकर, गावातील प्रतिष्ठित नागरिक शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

**पाहिजेत**

**ड्रेसेस दुकानामध्ये काम करण्यासाठी मुलीं किंवा महिला पाहिजेत.**

**पत्ता :** 'मल्लिका बाय रीमा'
डॉ.नळदकर हॉस्पिटल समोर,
तरोडेकर भाजी मार्केटच्या मागे,वजीराबाद,नांदेड
मो.८२६२८४८२८६, ८४२१३६२६००

## लोकशाही दिनाचे सोमवारी आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी व अडचणींचे न्याय्य आणि तत्परतेने निराकरण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे दुपारी १२.३० ते ३ वाजेपर्यंत हा लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रकानुसार दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. या उपक्रमांतर्गत नागरिकांना आपल्या तक्रारी व अडचणी प्रशासनासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. या दिवशी अर्जांची नोंदणी दुपारी १२.३० वाजल्यापासून सुरू होईल. त्यानंतर प्राप्त अर्ज व निवेदनांवर संबंधित नागरिकांचे म्हणणे ऐकून घेण्यात येणार आहे.

## एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची २९ रोजी बैठक

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील एस.टी.सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची अत्यंत महत्वाची बैठक २९ ऑक्टोबर रोजी एस.टी. वर्कशॉप जवळ, सहयोगनगर,हनुमान मंदिर येथे सकाळी ११.३० वाजता आयोजित केली आहे.

सदर बैठकीत विविध विषयांवर चर्चा होणार असून यामध्ये एक वर्षाचा प्रवास मोफतचा पास देण्यात आला परंतु प्रवासासाठी प्रती व्यक्ती ५ रुपये अतीभार लावून अन्याय करण्यात आला तो रद्द करावा. व तो पास सर्व प्रकारच्या बसेसमध्ये कुठलाही फरक न भरता मंजुरी देण्यात यावी, या प्रमुख मागणीसह सन २०१६ ते २०२० या कालावधीतील कराराच्या फरकाची रक्कम तात्काळ एक रकमी देण्यात यावी, यासह विविध विषयांवर चर्चा होणार असून पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सेवानिवृत्त एस.टी.कर्मचाऱ्यांनी तसेच जुलै-२०२६ पासून पेन्शन न मिळालेल्या सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित रहावे, असे आवाहन स.ना.अंबेकर, विवेक चौधरी, सुरेश पवार, के.व्ही.गंजेवार, गणेश कांबळे, डी.एम.गंगातीरे, दिपक मुदीराज, स.अहमद, घोरबांड, डी.टी.लधवे, बामणे, गजभारे, शेख महेबुब यांच्यासह अनेकांनी केले आहे.

### जाहीर प्रगटन

आर.पी.शिंदे, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,न्यायालय क्र.१, नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१३९६/२०२६
रोहिणी वि. आयुक्त
नोटीस

अर्जदार:- रोहिणी रतन घोरपडे, वय ३७ वर्ष, व्यवसाय-घरकाम, रा.गौतमनगर, सांगवी, नांदेड, ता.जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : आयुक्त,तर्फे जन्म व मृत्यु नोंदणी अधिकारी, नां.वा.श.महानगरपालिका,नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार रोहिणी रतन घोरपडे, वय ३७ वर्ष, व्यवसाय-घरकाम, रा.गौतमनगर, सांगवी,नांदेड, ता.जि.नांदेड यांचा मुलगा नामे यश रतन घोरपडे याचा जन्म दिनांक १४.०२.२०१९ रोजी राहत्या घरी सांगवी,नांदेड ता.जि.नांदेड येथे झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ०३/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक २६.१०.२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

### जाहीर प्रगटन

४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांच्या न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१४१३/२०२६
माधुरी विरुध्द ग्रामसेवक

**अर्जदारः-**१. माधुरी विठ्ठलराव भोसले
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.थुगाव ता.नांदेड जि.नांदेड

गैरअर्जदारः- मा.ग्रामसेवक साहेब,ग्रामपंचायत कार्यालय थुगाव ता.जि.नांदेड

दावा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार माधुरी विठ्ठलराव भोसले वय १८ वर्ष धंदा शिक्षण रा.थुगाव ता.नांदेड जि.नांदेड याने या न्यायालयात त्यांचे नामे माधुरी विठ्ठलराव भोसले यांच्या जन्माच्या नोंदीबाबत आदेश होणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्याने माधुरी विठ्ठलराव भोसले हिचा जन्म दिनांक २८/०८/२००८ रोजी मौजे थुगाव ता.जि.नांदेड येथे झाला असे नमुद केले आहे.

सदर अर्जदाराला माधुरी विठ्ठलराव भोसले यांचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक १०/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**लिपिक फौजदारी विभाग**
४ थे फौजदारी न्यायालय,
नांदेड

स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
मुख्य न्यायदंडाधिकारी
न्यायालय,नांदेड

### जाहीर प्रगटन

५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१३०९/२०२६
मिनाबाई वि.आयुक्त नां.वा.श.म.न.पा.
नोटीस

अर्जदार:- मिनाबाई सतिष गायकवाड वय-४१ वर्ष, रा. आंबेडकरनगर, नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : नां.वा.श.म.न.पा.नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार मिनाबाई सतिष गायकवाड वय-४१ वर्ष, रा. आंबेडकरनगर नांदेड यांचे पति नामे सतिष भुजंगराव गायकवाड यांचा मृत्यु दिनांक ०७.०८.२०२१ रोजी राहत्या घरी आंबेडकरनगर नांदेड येथे झाला असता अर्जदाराने मृत्यु प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन मृत्यु प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नावे मृत्यु प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ०४/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक १७-१०-२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

पान १ वरुन **दुष्काळात शैक्षणिक फीचा...**

आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या प्रकरणात लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शिक्षण विभागामार्फत संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात. शुल्क वसुली बाबत पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व मानसिक त्रास टाळावा आणि पालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४